दि. 16/7/2024

## प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक श्री.खेमराज नागोराव राठोड, वय ३९ वर्ष पद—स्थापत्य अभियांत्रीकी सहायक, वर्ग ३, बांधकाम विभाग, पंचायत समीती नांदुरा, रा. प्लॉट नं.२३, माला मंगल कार्यालयाजवळ,पार्वतीनगर,उमरसरा जुना यवतमाळ ता.जि.यवतमाळ |
| लाच मागणी | २०००/— रुपये |
| लाच स्विकारली | २०००/— रुपये |
| घटनास्थळ | बांधकाम विभाग, पंचायत समीती नांदुरा जि.बुलढाणा |
| घटना तारीख | दिनांक १६.०७.२०२४ |

**थोडक्यात हकीकत** :—यातील तक्रारदार (वय ३० वर्षे) यांचे व त्यांच्या आईचे घरकुलाचे प्रस्ताव पंचायत समीती नांदुरा येथे सादर केलेले होते. तक्रारदार हे त्यांच्या आईच्या घरकुलासाठी सादर केलेल्या प्रस्तावाची चौकशी करण्याकरीता पंचायत समीती नांदुरा येथे गेले असता यातील लोकसेवक श्री.खेमराज राठोड, पद—स्थापत्य अभियांत्रीकी सहायक, बांधकाम विभाग, पंचायत समीती नांदुरा हे तक्रारदार यांच्या घरकुलाचा प्रस्ताव पाठविल्याचा मोबदला म्हणुन २०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार काल दिनांक १५.०७.२०२४ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, लोकसेवक श्री.खेमराज राठोड, पद—स्थापत्य अभियांत्रीकी सहायक, बांधकाम विभाग, पंचायत समीती नांदुरा यांनी तक्रारदार यांचेकडे २०००/—रुपये लाच मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली. त्यावरुन आज दिनांक १६.०७.२०२४ रोजी आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.राठोड यांना तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारतांना पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले. त्यावरुन आरोपी यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुद्ध पोलीस स्टेशन नांदुरा येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे.

सदर कार्यवाही :—

१.मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

२.मा.श्री.अनिल पवार, अपर पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा, पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, सापळा मदत पथक सफौ शाम भांगे, पोहेकॉ/प्रविण बैरागी, पोना/विनोद लोखंडे, पोकॉ रंजीत व्यवहारे, चानापोकॉ/नितीन शेटे, शेख अर्शीद अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२—२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी केले आहे.

कार्यालय पोलीस उप अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा — सत्यमेव जयते

(श्रीमती शितल घोगरे)
पोलीस उपअधिक्षक,
अ‍ॅन्टी करप्शन ब्यरो बुलढाणा

Scanned with CamScanner